कार्यालय :- शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद,वर्धा
१ ला माळा ,प्रशासकीय इमारत,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,
सिव्हील लाईन, वर्धा-४४२००१
दूरध्वनी क्रमांक ०७१५२-२४३५९७ Email ID- eopriwardha@gmail.com


पत्र क्रमांक जिपव/प्राशिवि/खाप्राशा/वशि 460 / २०२६ दिनांक:-27/ 8 /२०२६

प्रति,

१. अध्यक्ष/सचिव,
श्रीराम कठाणे फाउंडेशन,
वर्धा

२. मुख्याध्यापक,
सक्षम स्कुल, वर्धा, ता.जि. वर्धा

**विषय** :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**संदर्भ** :- 1. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वर्धा यांचे पत्र क्र. 1015/26 दि. 16/06/2026

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, संदर्भीय पत्रानुसार प्राप्त प्रस्ताव तसेच दि. 25/04/2026 रोजी उपशिक्षणाधिकारी (प्राथ.), जि. प. वर्धा यांचेद्वारे शाळेची करण्यात आलेली तपासणी याआधारे, मी, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, वर्धा, दिनांक 01/04/2026 ते दिनांक 31/08/2028 या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते 8 वी करिता **सक्षम स्कुल, वर्धा** या शाळेस तात्पुरती मान्यता प्रदान करीत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. **नियुक्त केलेले शिक्षक मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र. 1385/25 मध्ये दि. 1/9/2025 रोजी पारित आदेशानुसार विहीत कालावधीत TET/CTET परीक्षा उतीर्ण करतील.**

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि
(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.
9. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या
11. मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या –

| | |
|---|---|
| • शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | 23100 चौ. मी |
| • एकूण बांधकाम क्षेत्र | 4000 चौ. मी |
| • खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | 5247 चौ. मी |
| • वर्गखोल्यांची संख्या | 28 |
| • कार्यालय-भांडार-मुख्याध्यापकाची खोली | 03 |
| • मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे- जेथे वापरण्यासाठी य प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | **प्रसाधनगृह** -- 18<br>**मुतारी** -- 60 |
| • पिण्याच्या पाण्याची सुविधा | **विहीर** |
| • दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | **लागू नाही** |
| • अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता | **आहे** |
| • वाचन साहित्य विनायासास उपलब्ध. | **आहे** |

12. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
13. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
14. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये
नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
15. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
16. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.
17. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता **संकेतांक** 27080806706 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
18. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
19. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी. १९. जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

( सीमा पाटील )
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**प्रतिलिपी** – गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वर्धा यांना माहितीस्तव अग्रेषित.